महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा (जि.प.प.स.निवडणूक विभाग)

| | |
|---|---|
| E-Mail : dydeobuldhana@gmail.com | दुरध्वनी क्रमांक : 07262-242411 /243116 |
| क्रमांक कावि/अ.का./ग्रा.प.नि./कक्ष-१५/ ७४७/२०२५ | दिनांक : - ०५/१०/२०२५ |

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा

२) उपविभागीय अधिकारी बुलढाणा, सिंदखेड राजा, मेहकर, खामगांव, मलकापुर ,जळगांव जामोद

३) तहसिलदार बुलढाणा / चिखली / देऊळगांव राजा / सिंदखेड राजा / मेहकर / लोणार /खामगांव शेगांव/ जळगांव जामोद / संग्रामपुर / मलकापुर / नांदुरा / मोताळा.

४) गट विकास अधिकारी बुलढाणा / चिखली / देऊळगांव राजा / सिंदखेड राजा / मेहकर / लोणार / खामगांव / शेगांव/ जळगांव जामोद / संग्रामपुर / मलकापुर / नांदुरा / मोताळा

**विषय** :- राज्यातील ३२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम.

**संदर्भ** :-

१) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/ का.७ दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५

२) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.३०/ का.७ दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५

*****

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रमाची प्रत (संदर्भीय पत्र क्रमांक २) यासोबत पाठविण्यात येत असून सोबतच्या प्रपत्र -१ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी आरक्षण सोडत ही जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर पंचायत समिती निर्वाचक गणासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्याच्या मुख्यालयी आरक्षणाची सोडत काढण्यात यावी. जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षण सोडतीच्या सुचनेस जिल्हा व तालुका स्तरावर नेमुन दिलेल्या दिनांकास आरक्षण सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांस मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच आरक्षण सोडतीची सुचना दिनांक १०/१०/२०२५ रोजी वृत्तपत्रामध्ये तसेच सर्व अधिनस्त कार्यालयाचे, पंचायत समिती कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावे. प्रसिध्दीचा नमुना (परिशिष्ट-७ जाहिर प्रकटन) सोबत जोडण्यात येत आहे. राज्य निवडणुक आयोगाचे संदर्भीय पत्र क्रमांक ०२ मधील प्रपत्रानुसार आरक्षणाच्या सर्व टप्यावरील अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

**सहपत्र** :-

०१) राज्य निवडणुक आयोगाचे दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजीचे आदेश

०२) परिशिष्ट-७ -जाहीर प्रकटन

(डॉ.किरण पाटील)
जिल्हाधिकारी बुलढाणा

**प्रतिलिपी** :-

१) मा.उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई ३२

२) मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,अमरावती यांना माहितीस्तव सादर.

जिल्हाधिकारी बुलढाणा

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.३०/का.७, दि.०१/१०/२०२५ सोबतचे सहपत्र)

प्रपत्र-१

## राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका

## सदस्य आरक्षण निश्चिती / सोडतीचा कार्यक्रम

| क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप आरक्षण** | | |
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे. | जिल्हाधिकारी | ०६/१०/२०२५ पर्यंत |
| २ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे. | विभागीय आयुक्त | ०८/१०/२०२५ पर्यंत |
| ३ | आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसह) बाबत} | जिल्हाधिकारी | १०/१०/२०२५ |
| ४ | आरक्षणाची सोडत काढणे<br>नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसह) बाबत} | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | १३/१०/२०२५ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ५ | प्रारुप आरक्षणाची अधिसूचना प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १४/१०/२०२५ |
| | **ब) हरकती व सूचना** | | |
| ६ | जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | - | १४/१०/२०२५ ते १७/१०/२०२५ |
| ७ | प्राप्त प्रारुप आरक्षणावरील हरकती व सूचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे | जिल्हाधिकारी | २७/१०/२०२५ पर्यंत |
| ८ | प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिम करणे | विभागीय आयुक्त | ३१/१०/२०२५ पर्यंत |
| | **क) अंतिम आरक्षण** | | |
| ९ | अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०३/११/२०२५ पर्यंत |

टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.

01.10.2025

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा (जि.प.प.स.निवडणूक विभाग)

| | |
|---|---|
| E-Mail : dydeobuldhana@gmail.com | दुरध्वनी क्रमांक : 07262-242411 /243116 |
| क्रमांक कावि/अ.का./ग्रा.प.नि./कक्ष-१५/ ७८३ /२०२५ | दिनांक : - ०५ / १० /२०२५ |

**परिशिष्ट - ७**

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्यारिता सोडत पध्दतीने कार्यवाही करण्याकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे विशेष सभा आयोजित केली आहे.

**सभेचे ठिकाण :-**

१) **जिल्हा परिषद बुलढाणा -करीता आरक्षणासाठी नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा**

२) **पंचायत समिती बुलडाणा -करिता जिल्हा नियोजन समिती सभागृह जि.का. बुलढाणा**

३) **पंचायत समिती (बुलढाणा सोडून इतर सर्व) - संबधित तहसिल कार्यालयाच्या सभागृहामध्ये**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव / पंचायत समितीचे नाव | सभेचा दिनांक | सभेची वेळ सकाळ /दुपार | आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी /संबंधित तहसिलदार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारुप आरक्षणावर हरकती व सुचना सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जिल्हा परिषद बुलढाणा** | १३/१०/२०२५ | दुपारी १२.३० | १४/१०/२०२५ | दिनांक १४/१०/२०२५ ते दिनांक १७/१०/२०२५ |
| १ | पंचायत समिती बुलढाणा | १३/१०/२०२५ | दुपारी १२.०० | १४/१०/२०२५ | |
| २ | पंचायत समिती चिखली | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| ३ | पंचायत समिती देऊळगांव राजा | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |
| ४ | पंचायत समिती सिंदखेड राजा | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| ५ | पंचायत समिती मेहकर | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |
| ६ | पंचायत समिती लोणार | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| ७ | पंचायत समिती खामगांव | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |
| ८ | पंचायत समिती शेगांव | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| ९ | पंचायत समिती जळगांव जामोद | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |
| १० | पंचायत समिती संग्रामपुर | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| ११ | पंचायत समिती मलकापुर | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |
| १२ | पंचायत समिती नांदुरा | १३/१०/२०२५ | दुपारी ०३.०० | १४/१०/२०२५ | |
| १३ | पंचायत समिती मोताळा | १३/१०/२०२५ | सकाळी ११.०० | १४/१०/२०२५ | |

जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर राहावे.

**दिनांक :- /१०/२०२५**

(डॉ.किरण पाटील भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी बुलढाणा